**नि.फौ.ख.क्र. ५२/२०१५**
सरकार – वि.- सुनील पानीकर
**निशाणी क्र. २१**

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ -</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – राहुल शिवाजीराव काकडे - टिपण
वय – ३९ वर्षे, व्यवसाय – सहा.उपनिरीक्षक, रेसुब चिंचवड,
सध्या रा. - चंदननगर, पुणे.

**<u>फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २९९ प्रमाणे, सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए. एस. काळे यांचे मार्फत सुरु-</u>**

सन २०१५ मध्ये माझी नेमणुक रेसुब कार्यालय, पुणे येथे प्रधान आरक्षक या पदावर होती. दि. १५/०१/२०१५ रोजी माझी नेमणुक तपास कामी पुणे रेल्वे स्टेशनवर करण्यात आली होती. त्यादिवशी माझे सोबत प्रधान आरक्षक हरीशचंद्र पोकर व आरक्षक शेखर जाधव हे देखील होते. त्यादिवशी रात्री १०.३० वाजता प्लॅटफॉर्म क्र. १ वरती असताना आम्हाला चोर-चोर असा आवाज ऐकु आला. आम्ही पाहिले की, एक व्यक्ती पळुन जात असताना आम्ही त्यास पकडले. त्यावेळी फिर्यादी तेथे येवुन त्याने आम्हाला सांगितले की, सदरच्या व्यक्तीने त्याचे पाकीट चोरले आहे. आम्ही चौकशी केली असता आरोपीने त्याचे नाव सुनील पानीकर असे सांगितले. पुढील कारवाई करीता आम्ही सदरील आरोपीस लोहमार्ग पोलीस स्टेशन, पुणे यांचेकडे सुपूर्त केले. आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकतो. तो आज रोजी न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पुर्ण .**

**<u>आरोपी हा फरार असल्याने उलटतपास नाही.</u>**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.05.14 17:21:17 +0530

दि. १४/०५/२०२६
स्थळ - पुणे

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.